महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे  Rs.2/-  कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ १३ जून २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३४५ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

थोडक्यात महत्वाचे

# भिवंडी पालिकेत प्रभाग रचनेला सुरवात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता :: शरद भसाळे

**भिवंडी :** विधानसभा निवडणुकी नंतर प्रतीक्षेत असलेल्या महानगर पालिकेच्या निवडणुकीच्या हालचालीला राज्याच्या प्रशासकीय पातळीवरून सुरुवात झाली असून "ड " वर्ग महानगरपालिकांची प्रभाग रचना करण्या बाबतचे आदेश-२०२५ भिवंडी महानगरपालिकेस (११ जुलै) रोजी मिळाले आहेत. त्यामुळे पालिका आयुक्त तथा प्रशासक अनमोल सागर यांच्या मार्गदर्शनाखाली पालिकेच्या निवडणुक कार्यालयात कागदपत्रांची जुळवाजुळव सुरु झाली असून शासन निर्देशानुसार भिवंडी महानगर पालिकेच्या नवीन 45 प्रभाग रचनेकडे राजकीय पक्षांचे पुढारी व नागरिकांचे लक्ष लागले आहे.

भिवंडी महानगर पालिका ही "ड " वर्ग महानगरपालिका असून सन २०११ साली केलेल्या शहराच्या जनगणने नुसार मनपा क्षेत्राच्या हद्दीतील नागरिकांची लोकसंख्या सुमारे ७ लाख ९ हजारापेक्षा जास्त आहे.मात्र गेल्या १४ वर्षात शहरात झालेल्या विकासानुसार येथील लोकसंख्या वाढली आहे.त्यानुसार नागरिकांच्या अपेक्षा वाढल्या असून त्यांना अपेक्षित मूलभूत सुविधा मिळत नाही.तर स्थानिक काही लोकप्रतिनिधींनी गेल्या १० वर्षात शासनाकडून मोठा निधी उपलब्ध करून घेतला.मात्र महानगर पालिका "क" वर्गा मध्ये नेऊ शकले नाही. तर काही लोकप्रतिनिधी ही नगरपालिका " ड " मध्ये राहावी याच मानसिकमध्ये राहून शहराची स्थिती जैसे थे ठेवण्याच्या प्रयत्नात असल्याचे दिसून येते. या पूर्वी राज्य शासनाने २०२२ मध्ये निवडणूक घेण्याचे ठरविले होते. त्यासाठी राज्य शासनाने दिलेल्या आदेशानुसार ३ वार्ड सदस्यांचा एक प्रभाग बनविला होता. त्यानुसार अंतिम यादी देखील तयार करून शासनाकडे पाठविली होती.मात्र कोर्टाच्या आदेशानुसार ही निवडणूक प्रक्रिया थांबविण्यात आली होती. आता सर्वोच्च न्यायालयाने ६ मे २०२५ रोजी कोर्टाने दिलेल्या निर्णया नुसार शासनाने महानगरपालिकेच्या निवडणूक प्रक्रियेस सुरुवात केली आहे. त्यानुसार त्यांनी भिवंडी महानगर पालिका प्रशासनास प्रभाग रचना करण्याचे आदेश दिले आहेत. त्या आदेशानुसार नुसार प्रत्येक प्रभागात ४ सदस्य राहणार आहेत. सर्वच प्रभाग चार सदस्यांचे होत नसल्यास एक प्रभाग ३ अथवा ५ सदस्यांचा होतील. अथवा दोन प्रभाग ३ सदस्यांचे होतील. तसेच भौगोलिक सलगता राखण्याच्या दृष्टीने प्रभाग रचना करताना नागरिकांची गैरसोय टाळता येईल अशा ठिकाणी असावेत, असे नमूद केले आहे. तसेच शासनाने दिलेल्या आदेशानुसार प्रभागाची सरासरी लोकसंख्या, सदस्य संख्या,प्रभागाची संख्या, प्रभाग रचनेसाठी मार्गदर्शक तत्वे, प्रभागाच्या सीमारेषा, प्रभागाचे गुगल मॅप प्रमाणे नकाशे आदी बाबत प्रारूप रचनेसाठी सुचना व निर्देश दिले आहेत.सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर राजकीय पक्षांच्या कार्यालयात निवडणूक निमित्ताने हालचाली सुरु झाल्या आहेत. मात्र निवडणूक कार्यक्रम जाहीर न झाल्याने गेल्या काही दिवसांपासून कार्यकर्ते आणि पुढारी केवळ भेटीगाठी आणि चर्चेवर भर देत होते. मागील निवडणुकीत भिवंडी महानगर पालिकेचे एकूण ९० नगरसेवक निवडून आले होते. त्यामध्ये ४५ पुरुष व ४५ महिला नगरसेविका यांचा समावेश होता. त्यावेळी एकूण ४ वार्ड सदस्यांचा एक प्रभाग होता. त्यामुळे २१ प्रभाग ४ सदस्यांचे आणि २ प्रभाग ३ सदस्यांचे होते. आता प्रभाग रचना नव्याने होणार असल्याने सत्तेचे गणित मांडणाऱ्या अपक्ष नगरसेवकांच्या आणि राजकीय पक्षांच्या पुढाऱ्यांच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. शहरातील समस्या "आ" वासून बसल्या असताना त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या उमेदवारांना या निवडणुकीत चांगलाच फटका बसणार असल्याची दबक्या आवाजात चर्चा सुरू झाली आहे.

———————-

सध्या प्राथमिक स्थितीत जनगणनेनुसार शासनाकडून प्रभाग रचना करण्याचे आदेश आले आहेत. निवडणूक निमित्ताने एकूण कार्यक्रमाचा तारखेनुसार प्रारूप व अंतिम यादी व प्रभाग जाहीर करण्याचा आराखडा शासना कडून आलेला नाही. त्यामुळे ज्याप्रमाणे शासनाचे आदेश उपलब्ध होतात त्यानुसार कामाची सुरुवात झालेली आहे.
- अजित महाडिक, निवडणूक विभाग अधिकारी भिवंडी महानगर पालिका

# मृत्यूचे टेक ऑफ
## अहमदाबाद विमान दुर्घटना नागपूरमधील कुटुंब ठार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

अहमदाबादहून लंडनला जाणारं एअर इंडियाचं विमान मेघानी नगरमध्ये दुर्घटनाग्रस्त झालं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, विमानाने टेक ऑफ केल्यानंतर काही वेळातच दुर्घटनाग्रस्त झालं. हे विमान दिल्लीमधून अहमदाबादला पोहोचलं होतं आणि तेथून लंडनला रवाना होणार होतं. या दुर्घटनेनंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मुख्यमंत्री भुपेंद्र पटेल यांच्याशी चर्चा केली. मिळालेल्या माहितीनुसार, माजी मुख्यमंत्री विजय रुपानी देखील या विमानात होते.

### नागपूरमधील कुटुंब ठार

नागपूरमधील कुटुंब ठार झालं आहे. नागपुरात माहेर असलेल्या यशा कामदार मोढा (कामदार माहेरचे आडनाव आहे) आणि त्यांचा मुलगा रुद्र मोढा हेदेखील दुर्घटनाग्रस्त विमानात होते. याशिवाय यशा मोढा यांच्या सासू रक्षा मोढा यादेखील होत्या. नागपुरातील क्वेटा कॉलनी येथील रामपेठ येथे कामदार कुटुंब वास्तव्यास आहे. दुर्घटनेची माहिती मिळताच सर्व कुटुंब घरातून तातडीने निघून गेलं आहे. अहमदाबादमधील विमान दुर्घटनेत सुनील तटकरेंच्या नातेवाईकाचाही समावेश असल्याचे समजते.

अहमदाबादहून लंडन गॅटविकला दुपारी 1.38 वाजता निघालेले हे विमान, बोईंग 787-8 होते. विमानात 242 प्रवासी आणि क्रू मेंबर्स होते, ज्यामधील 2 पायलट आणि 10 क्रू मेम्बर्स होते. पोलीस आयुक्तांनी दिलेल्या माहितीनुसार, सर्वच्या सर्व 242 प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. विमानातील प्रवाशांची यादी समोर आली असून, यादीत मयूर अशोक पाटील, महादेव पवार आणि आशाबेन पवार ही मराठी नावं दिसत आहे. नावांवरुन हे सर्व महाराष्ट्रातील असावं असं दिसत आहे, मात्र याबाबत अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही.



### क्रू मेम्बर्समध्ये सुनील तटकरेंच्या भाचेसून

एअर इंडियाच्या AI171 विमानात एकूण 242 प्रवासी प्रवास करत होते. यापैकी 169 भारतीय, 53 ब्रिटिश, 1 कॅनेडियन आणि 7 पोर्तुगीज नागरिक आहेत. या विमानात महाराष्ट्रातीलही प्रवासी होते. दरम्यान विमान दुर्घटनेत राष्ट्रवादी काँग्रसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या नातेवाईकाचाही समावेश आहे. अपर्णा महाडिक एअर इंडियाच्या विमानात क्रू मेम्बर होत्या. त्या सुनील तटकरे यांच्या भाचेसून म्हणजेच भाच्याच्या पत्नी आहेत.

# मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे जिल्ह्यात शाळा प्रवेशोत्सवाचे आयोजन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे/दि. १२ :** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता जिल्हा परिषद, ठाणे अंतर्गत येणाऱ्या सर्व प्राथमिक शाळांमध्ये दि. १६ जून, २०२५ रोजी शाळा प्रवेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाद्वारे नव्याने प्रवेश घेणाऱ्या बालकांचे आनंददायी आणि उत्साहवर्धक वातावरणात स्वागत करण्यात येणार आहे. ठाणे जिल्ह्यातील एकूण १ हजार ३२८ जिल्हा परिषद शाळांमध्ये सुमारे ७१ हजार ३२४ विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यांना ३ हजार २७९ शिक्षक मार्गदर्शन करत आहेत. नव्या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्यात सकारात्मक



ऊर्जा निर्माण होण्यासाठी विविध उपक्रमांची आखणी करण्यात आली आहे.

**शाळा प्रवेशोत्सवाची वैशिष्ट्ये व नियोजन:**

प्रवेशपात्र विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात येणार आहे.

"पहिले पाऊल" उपक्रम – इ. १लीच्या विद्यार्थ्यांचा पायाचा ठसा घेऊन पालकांना देण्यात येणार आहे. सर्व नवख्यांना मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, बूट व मोजे यांचे वितरण. मध्यान्ह भोजनात गोड पदार्थ देऊन पहिला दिवस गोड करण्याचे नियोजन प्रभातफेरी, ढोल, बॅनर व फलकांद्वारे गावात जनजागृती. कोविड-१९ अनुषंगाने आरोग्यविषयक प्रबोधन व मार्गदर्शन.

### रोहन घुगे यांचे विशेष मार्गदर्शन

या सर्व उपक्रमांची अंमलबजावणी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या विशेष मार्गदर्शनाने होत असून, जिल्हा परिषद ठाणे शिक्षण विभागाकडून हे आयोजन यशस्वी करण्यासाठी सर्व स्तरांवर समन्वयाने कार्य केले जात आहे. शाळा प्रवेशोत्सवाचा उद्देश शिक्षणाची गोड सुरुवात घडवून आणणे, बालकांमध्ये शाळेप्रती आकर्षण निर्माण करणे व पालकांमध्ये जागरूकता वाढवणे हा आहे. जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये दि. १६ जून २०२५ रोजी हा प्रवेशोत्सव जल्लोषात साजरा होणार असल्याची माहिती शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांनी दिली आहे.



# आ. किसन कथोरे यांच्या हस्ते तळेगाव , धसई येथे दाखले वाटप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड दि.१२ -** मुरबाड तालुक्यातील प्रसिद्ध बाजारपेठ असलेल्या धसई येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन १२जून २०२५रोजी मुरबाड विधानसभा आमदार किसन कथोरे यांच्या हस्ते करण्यात आले व शिबिरात विविध प्रकारचे दाखले आमदार किसन कथोरे यांच्या हस्ते देण्यात आले.

यावेळी मुरबाड तहसीलदार अभिजीत देशमुख, नायब तहसीलदार अमोल शिंदे, निवासी नायब तहसीलदार सुषमा बांगर, माजी सभापती दिपक पवार, माजी पंचायत समिती सदस्य अनिल घरत, जिल्हा परिषद माजी सदस्य विठ्ठल डामसे यांच्यासह अनेक मान्यवर मोठ्या संख्येने, उपस्थित होते.अतिशय दुर्गम भागामध्ये स्थित असलेल्या मौजे तळेगाव येथील जिल्हा परिषद खालील प्रमाणे दाखल्यांचे वाटप करण्यात आलेले आहे ते पुढील प्रमाणे:-धसई मंडळ शिबीरात वय व अधिवास प्रमाणपत्र १९, उत्पन्न दाखले १२७, जातीचे दाखले व नॉन क्रिमीलेअर ८, रेशन कार्ड नाव कमी जास्त बाबत१५, असे मिळून १६९ तर तळेगाव शिबिरात उत्पन्न दाखला १२०, जातीचे दाखले १३, वय व अधिवास दाखला १५, रेशन कार्ड मध्ये नाव कमी व वाढवणे २ ,असे मिळून १५०तर दोन्ही मिळून ३१९ विविध प्रकारचे दाखले वाटप करण्यात आल्याची माहिती मुरबाड नायब तहसीलदार अमोल शिंदे यांनी दिली आहे.

सदरचे दाखल्यांचे शिबिर दरम्यान अशा दुर्गम भागामध्ये मुरबाड तालुक्यापासून चाळीस-पन्नास किलोमीटर अंतरावर आहेत त्यांच्यासाठी स्पीड पोस्टद्वारे घरपोच धाकले सुविधा या योजनेची घोषणा करण्यात आलेली आहे. तसेच येणाऱ्या काळामध्ये तहसील आपल्या दारी यासारख्या योजना राबवण्याचे मानस मुरबाड तहसीलदार अभिजीत देशमुख यांनी व्यक्त केले आहे.









# भिवंडीतील कामवारी नदीला जलपर्णीचा विळखा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी शहराच्या प्रवेशद्वारावरुन वाहणाऱ्या पवित्र अशा कामवारी नदी च्या पाण्यावर गेल्या महिनाभरापासून हिरव्या जलपर्णीचा विळखा पडल्याने नदीचे पाणी आटून काही प्रमाणात दुषीत झाले आहे त्यामुळे स्थानिक नागरिकांकडून चिंता व्यक्त केली जात असुन महापालिका व शेलार ग्रामपंचायत माध्यमातून ही नदी स्वच्छ करण्यात यावी अशी मागणी होत आहे.

भिवंडी तालुक्यातील कवाड गांव जवळील देपिवली गावाच्या कुशीत उगम पावून ग्रामीण भागातून ३२ किलोमीटरचा प्रवास करीत शेलार व भिवंडी शहराच्या सिमेवरून वाहत असलेली कामवारी नदी पुढे जाऊन वसई खाडीत मिसळत आहे.शेलार ग्रामपंचायत व भिवंडी मनपाच्या सिमेवर असलेली कामवारी नदी धार्मिक कार्यक्रमा मुळे प्रसिद्ध आहे. दुर्गादेवी व गणेश मूर्ती विसर्जन सोहळया सारखे विविध कार्यक्रम या नदी मध्ये होत असतात.त्यामुळे या नदीला वेगळे स्वरूप प्राप्त झाले आहे.मात्र गेल्या महिनाभरापासून सध्या नदीच्या पात्रात हिरव्या जलपर्णीचा विळखा पडला आहे.त्यामुळे नदीचे पाणी काही प्रमाणात आटले असुन नदीपात्रातील जलचर व जलस्रोत नामशेष होण्याच्या मार्गावर आहे.नदी पात्रात हिरवी जलपर्णी वाढली असतानाच या नदी पात्रात शेलार ग्रामपंचायत हद्दीतील सायझिंग व डाईंग यांचे प्रक्रिया केलेले केमिकलयुक्त पाणी, शहरातील मलनिस्सारण प्रकल्पातील सांडपाणी थेट नदी व खाडी पात्रात सोडले जात असल्याने ही नदी आधीच प्रदूषणाच्या विळख्यात अडकलेली आहे. त्यामुळे काही सामाजिक कार्यकर्तेनी प्रदूषण रोखण्यासाठी शासन दरबारी तक्रारी केल्या आहेत मात्र त्याकडे सराईत दुर्लक्ष झाले आहे.असे असताना आता हिरव्या जलपर्णी मुळे त्यात भर पडली आहे.ठाणे जिल्हाधिकारी यांनी शासन आदेशानुसार नदी पुनर्जीवन प्रकल्पा अंतर्गत कामवारी नदींचा समावेश केला आहे.परंतु या नदीच्या दुरावस्थेकडे जिल्हा प्रशासन,प्रदूषण नियंत्रण महामंडळ व भिवंडी महानगरपालिका या सर्वच यंत्रणांचे दुर्लक्ष केले आहे. राज्य शासन व महापालिका प्रशासनाने तातडीने नदीच्या पाण्यावरील हिरव्या जलपर्णी तातडीने काढून नदी स्वच्छ करावी अशी मागणी प्रवासी सेवा संघर्ष समितीच्यावतीने करण्यात आली आहे.

# मुरबाड तालुका खरेदी विक्री संघाच्या चेअरमन पदी संतोष पवार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील सहकार क्षेत्रावर माजी आमदार गोटिराम पवार यांची गेले 40 वर्ष निर्विवाद एकहाती सत्ता होती. या सत्तेला सुरूंग लावण्याचे काम विद्यमान आमदार किसन कथोरे यांनी सुरु केले असून त्याचा पहिला दणका त्यांनी खरेदी विक्री संघावर प्रशासकीय संचालक मंडळ नेमुन केला आहे. दि.05/06/ 2021 रोजी मुदत संपलेल्या खरेदी विक्री संघावर प्रशासक न नेमता त्याचा कारभार कोणतेही अधिकार नसताना जुन्या संचालक मंडळाकडून केला जात होता. याची दखल घेत आमदार किसन कथोरे यांनी हस्तक्षेप करून काही दिवसासाठी प्रशासक नेमला आणि आता संघावर दहा सदस्यांचे प्रशासकीय संचालक मंडळ नेमले आहे.यापुढे खरेदी विक्री संघाचा कारभार हे नविन संचालक मंडळ पाहणार असून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 कलम 77 अ 4 /1 नुसार मुरबाड साह्हायक निबंधक यांनी श्री. संतोष बबन पवार यांची चेअरमन पदी निवड करण्यात आली असून इतर 9 सदस्य म्हणून योगेश भोईर, मिलिंद मडके,संतोष भांगरथ, अनंता शिंगोळे, हर्षला भोईर, रमाकांत सासे,चंद्रकांत बोस्टे,संतोष दळवी, नामदेव कंटे यांची निवड करण्यात आली आहे.नविन संचालक मंडळाच्या निवडीमुळे तालुक्यातुन अभिनंदन होत आहे.

या नविन प्रशासकीय संचालक मंडळाकडून तालुक्यातील शेतकऱ्यांना योग्य न्याय मिळेल अशी अपेक्षा शेतकरी बांधव व्यक्त करत आहेत.



> गेले अनेक वर्ष खरेदी विक्री संघावर गोटिराम पवारांची सत्ता होती. सत्तेचा दुरूपयोग यांनी केला आहे मात्र आमदार कथोरे साहेबांनी हे वर्चस्व मोडीत काढले असून शेतकऱ्यांना खर्या अर्थाने आता न्याय मिळेल .लवकरच आमदार कथोरे साहेबांच्या मार्गदर्शनाखाली मुरबाड मध्ये भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात येणार आहे. कथोरे साहेबांनी माझ्या सारख्या सर्व सामान्य शेतकऱ्याच्या मुलाला संघाचे चेअरमन केले असल्याने त्यांचा मी शतशः आभारी आहे.
> – संतोष बबन पवार, नवनियुक्त चेअरमन खरेदी विक्री संघ मुरबाड

# एमआयडीसीतील नवीन कॉंक्रीट रस्त्यांचे तोडकाम सुरूच

## लाखो रुपयांचा शासकीय रकमेचा चुराडा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : एमआयडीसी निवासी मध्ये नवीन बनवलेले कॉंक्रीट रस्ते एका मागोमाग तोडणे सुरूच आहे. महावितरणची भूमिगत मेन केबल ही नानासाहेब धर्माधिकारी रस्त्यावरील सोनाक्षी सोसायटी समोर नादुरुस्त झाल्याने रस्ता तोडण्याशिवाय गत्यंतर नव्हते. मात्र यावेळी सदर रस्ता तोडण्याची वेळ रात्री दहा वाजता आसपास घेतली होती, कारण असे कॉंक्रीट रस्ते तोडताना लोकांचा विरोध होत असल्याने तसेच हा एमआयडीसी मधील महत्त्वाचा वर्दळीचा मुख्य रस्ता असल्याने तो रात्री तोडण्याच्या निर्णय घेतला असावा. बुधवारी रात्री अचानक जेसीबी सहित आठ, दहा जण येवून रस्ता तोडण्यास सुरवात केली गेली.

त्यानंतर महावितरण कर्मचाऱ्यांनी लगेच तेथे नवीन केबल टाकून घेतली आहे. हा एमआयडीसी मधील मुख्य रस्ता तोडला गेल्याने येथील नागरिकांनी आपला राग समाजमाध्यमाद्वारे व्यक्त केला आहे. यात महावितरणची कोणतीही चूक दिसत नाही कारण लोकांचा वीज पुरवठा सुरळीत चालू ठेवणे हे त्यांचे कर्तव्य आहे. एमएमआरडीएकडून नवीन कॉंक्रीट रस्ते बनविताना भूमिगत वीज केबल रस्त्याच्या बाजूला घेण्यासाठी महावितरणला अवधी दिला गेला नाही.

एमआयडीसी मधील नवीन कॉंक्रीट रस्ते बनविल्यापासून गेल्या वर्षभरात एकापाठोपाठ अनेक रस्ते हे विविध वाहिन्यांच्या दुरुस्तीसाठी तोडले जात आहेत. परंतु ते रस्ते पुन्हा दुरूस्त किंवा पूर्वीप्रमाणे ठीकठाक करण्यात आले नाहीत. गेल्या वर्षभरात एमआयडीसी निवासी मध्ये असे रस्ते तोडण्याची संख्या अंदाजे 30 आसपास झाली आहे. त्यामुळे जनतेचा पैशाचा अपव्यय होत आहे. जनतेचे सेवक, प्रतिनिधी म्हणवनारे हे सर्व आता चुपचाप पाहत आहेत. येणाऱ्या महापालिकेच्या निवडणुकीला येथील विविध समस्यांच्या त्रागा जनता त्यांच्यासमोर मांडून जाब विचारेल यात शंका नाही. असे मत यानिमित्ताने सामाजिक कार्यकर्ते राजू नलावडे यांनी व्यक्त केले आहे.



### गेल्या वर्षभरात अंदाजे ३० ठिकाणी रस्ते तोडले

# कंत्राटी शिक्षकांना पुन्हा सेवेत सामावून घेण्याची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : राज्यातील शिक्षक भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कंत्राटी (करार पद्धतीने कार्यरत) मुरबाड तालुकासह ठाणे जिल्ह्यातील शिक्षकांना पुन्हा सेवेत सामावून घेण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक, ठाणे जिल्ह्याचे अध्यक्ष कृष्णकांत मलिक यांनी आज शिक्षणमंत्री दादासाहेब भुसे यांची मुंबई येथे भेट घेऊन केली.

मंगळवार ता.१०: जून २०२५ सकाळी मुंबईत शिक्षणमंत्र्यांच्या निवासस्थानी झालेल्या भेटीत, मलिक यांनी शिक्षणमंत्र्यांसमोर कंत्राटी शिक्षकांच्या सद्यस्थितीबद्दल सविस्तर माहिती दिली. गेल्या वर्षांपासून अनेक कंत्राटी शिक्षक राज्याच्या विविध भागांमध्ये कार्यरत आहेत. त्यांना शिक्षणाच्या प्रक्रियेत चांगला अनुभव असून, विद्यार्थ्यांना शिकवण्यात त्यांची महत्त्वाची भूमिका आहे. सध्या सुरू असलेली शिक्षक भरती प्रक्रिया पूर्ण होण्यास आणखी काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

तोपर्यंत या कंत्राटी शिक्षकांना पुन्हा सेवेत घेतल्यास, शिक्षण व्यवस्थेतील रिक्त जागा भरण्यास मदत होईल आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळता येईल, असे मलिक यांनी निदर्शनास आणून दिले.

यावेळी मलिक यांनी शिक्षणमंत्र्यांना एक निवेदनही सादर केले. या निवेदनात कंत्राटी शिक्षकांच्या समस्या आणि त्यांना पुन्हा सेवेत सामावून घेण्याची आवश्यकता यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. शिक्षणमंत्र्यांनी मलिक यांचे म्हणणे सहानुभूतीपूर्वक ऐकून घेतले आणि या मागणीवर सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिले.या मागणीमुळे राज्यातील अनेक कंत्राटी शिक्षकांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे, जे सध्या भरती प्रक्रियेच्या प्रतीक्षेत आहेत आणि ज्यांना पुन्हा काम करण्याची संधी मिळण्याची आशा आहे. शिक्षण विभागाकडून या मागणीवर लवकरच निर्णय अपेक्षित आहे.

ठाणे जिल्हा प्राथमिक शिक्षक परिषदेचे अध्यक्ष कृष्णकांत मलिक यांची मागणी



# वटपौर्णिमेनिमित्त वड-पिंपळ वृक्षारोपणाची सुरुवात

## आसरा फाउंडेशनकडून पर्यावरणपूरक उपक्रम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : वटपौर्णिमेच्या निमित्ताने आसरा फाउंडेशनच्या वतीने शहापूर तालुक्यातील साकडबाव येथे एक आगळीवेगळी आणि पर्यावरणस्नेही संकल्पना राबवण्यात आली. या उपक्रमांतर्गत वड आणि पिंपळ यांसारख्या आयुष्यभर आधार देणाऱ्या पवित्र वृक्षांचे महिलांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन आसरा फाउंडेशनच्या प्रतिनिधी कीर्ती परब यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. विशेष म्हणजे या वृक्षारोपणात स्थानिक आदिवासी महिलांचा सक्रिय सहभाग होता. या महिलांनी पर्यावरण रक्षणाचा संकल्प करत, प्रत्येक वर्षी वटपौर्णिमेनिमित्त अशा प्रकारचे वड आणि पिंपळ वृक्ष लावण्याचा निर्णय घेतला. वड आणि पिंपळ हे भारतीय संस्कृतीत पवित्र मानले जाणारे वृक्ष असून, ते पिढ्यानपिढ्या समाजाला छाया, प्राणवायू आणि आधार देत आले आहेत. त्यामुळे या झाडांचे संगोपन हे केवळ धार्मिक नव्हे तर पर्यावरणीय दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाचे आहे.

या उपक्रमामुळे महिलांमध्ये पर्यावरण जाणीव वाढीस लागली असून, स्थानिक पातळीवर वृक्षसंवर्धनासाठीचा एक नवा अध्याय सुरु झाला आहे. ग्रामीण भागातील महिलांची ही पुढाकार घेणारी भूमिका खरंच कौतुकास्पद आहे असे आसरा फाऊंडेशनचे अध्यक्ष मोहन शिरकर यांनी सांगितले.



# ओमकार सोसायटीचे पाणी व वीज कनेक्शन तोडले ▌ रहिवासी संतप्त

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता / **पेण** : खांदा वसाहतीमधील ओमकार सोसायटीला बेकायदा धोकादायक ठरवून सोमवारी सकाळी इमारतीचे वीज व पाणी कनेक्शन पोलीस संरक्षणात पालिकेच्या अधिकाऱ्यांनी तोडले .याबाबत न्याय मागण्यासाठी पीडित रहिवाशांनी मुंबई उच्च न्यायालयात एक रीट याचिका दाखल केली आहे. तरीही भर पावसात ओमकार सोसायटी मधील नागरिकांना बेघर करण्याचा प्रताप पनवेल महापालिकेच्या प्रशासनाने केल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे एकाच इमारतीचे दोन स्ट्रक्चर ऑडिट हे नामांकित संस्थेकडून करण्यात आले आहेत .त्यामध्ये एका स्ट्रक्चर ऑडिटमध्ये सी १ दाखवून इमारत धोकादायक दाखवण्यात आली आहे .तर दुसऱ्या स्ट्रक्चर ऑडिटमध्ये सी २ दाखवून इमारतिची रिपेरिंग करून राहण्यास योग्य असल्याचे सांगण्यात आले आहे. तरीही याचा कोणताही फेरविचार न करता पालिकेच्या संबंधित अधिकाऱ्याने ओमकार सोसायटीचे वीज व पाणी कनेक्शन तोडून इमारतीच्या बाहेर काढण्याचा कारनामा केला आहे.



पनवेल मधील खांदा वसाहती मध्ये असलेल्या ओमकार सोसायटी मधील संचालक मंडळाने इमारतीचा पुनर्विकास करण्याचा घाट घातला. पुनर्विकास करण्यास सोसायटीमधील कोणाचाच विरोध नसल्याचे सांगण्यात आले आहे .मात्र इमारतीचा पुनर्विकास करणारा विकासक व सोसायटीच्या संचालक मंडळ यांच्यामध्ये कोणता करार झाला आहे, कोण कोणत्या अटी व शर्ती विकासकाला टाकण्यात आले आहेत. याची उत्तम माहिती सोसायटीमधील तब्बल २२ रहिवाशांनी सोसायटीच्या संचालक मंडळाकडे मागितली आहे. मात्र याबाबत संचालक मंडळ त्यांना कोणतीही माहिती देत नसल्याचा आरोप हा पीडित कुटुंबीयांनी केला आहे. संबंधित विकासकाने इमारतीचा पुनर्विकास करण्याच्या दृष्टीने वाटचाल करून पालिकेच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरून सुस्थितीत असलेल्या इमारतीला बेकायदा धोकादायक ठरवून इमारतीमधील जे रहिवाशी विरोध करत आहेत त्यांना पोलिसांचा धाक दाखवून इमारतीच्या बाहेर काढण्यात पालिका अधिकारी गुंतले आहेत .या इमारतीचे दोन स्ट्रक्चर ऑडिट करण्यात आले आहे. एक संचालक मंडळाने केलेले आहे तर दुसरे जे पीडित व जे ज्यांना पुनर्विकासाची पूर्ण माहिती नाही त्यांनी सुद्धा एका नामांकित कंपनीकडून स्ट्रक्चर ऑडिट करून घेतले आहे. दोघांच्याही स्ट्रक्चर ऑडिट मध्ये मोठी तफावत आहे. याची माहिती पालिका अधिकाऱ्यांना पीडित कुटुंबीयांनी दिलेली आहे. याबाबत न्याय मागण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयात एक याचीका ही दाखल करण्यात आली आहे .पण सुट्टी कालीन न्यायालय नसल्याने त्याची सुनावणी ११ जूनला होणार आहे .याचीही माहिती लिखित स्वरूपात पालिका प्रशासनाला देण्यात आली आहे. तरीही भर पावसात या इमारतीचे वीज व पाणी कनेक्शन तोडून या इमारतीमधील राहत असलेल्या रहिवाशांना बेघर करण्याचा प्रताप हा पालिका प्रशासनाने केल्याने रहिवासी व त्यांच्या सर्व नातेवाईकांमध्ये व आजूबाजूच्या नागरिकांमध्ये पालिका प्रशासनाच्या विरोधात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# गीतासार



## अध्याय १३ क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोगः

पुरुषः प्रकृतिस्थो हि भुङ्क्ते प्रकृतिजान्गुणान् । कारणं गुणसङ्गोऽस्य सदसद्योनिजन्मसु ॥ १३-२१ ॥

प्रकृतीत राहिलेला पुरुष प्रकृतीपासून उत्पन्न झालेल्या त्रिगुणात्मक पदार्थांना भोगतो आणि या गुणांची संगतीच या जीवात्म्याला बऱ्या-वाईट योनींत जन्म मिळण्याला कारण आहे. ॥ १३-२१ ॥

उपद्रष्टानुमन्ता च भर्ता भोक्ता महेश्वरः । परमात्मेति चाप्युक्तो देहेऽस्मिन्पुरुषः परः ॥ १३-२२ ॥

या देहात असलेला आत्मा वास्तविक परमात्माच आहे. तोच साक्षी असल्यामुळे उपद्रष्टा आणि खरी संमती देणारा असल्याने अनुमंता, सर्वांचे धारण-पोषण करणारा म्हणून भर्ता, जीवरूपाने भोक्ता, ब्रह्मदेव इत्यादींचाही स्वामी असल्याने महेश्वर आणि शुद्ध सच्चिदानंदघन असल्यामुळे परमात्मा म्हटला जातो. ॥ १३-२२ ॥

य एवं वेत्ति पुरुषं प्रकृतिं च गुणैः सह । सर्वथा वर्तमानोऽपि न स भूयोऽभिजायते ॥ १३-२३ ॥

अशा रीतीने पुरुषाला आणि गुणांसहित प्रकृतीला जो मनुष्य तत्त्वतः जाणतो, तो सर्व प्रकारे कर्तव्य कर्मे करीत असला तरी पुन्हा जन्माला येत नाही. ॥ १३-२३ ॥

# आरोग्य

## प्रथिनांचे मुबलक स्त्रोत

ब्रोकोली : ब्रोकोली हे एक सुपरफूड मानले जाते जे केवळ अँटीऑक्सिडंट्स आणि फायबरने समृद्ध नाही तर प्रथिने देखील समृद्ध आहे. 100 ग्रॅम ब्रोकोलीमध्ये सुमारे 2.5 ग्रॅम प्रथिने असतात. त्यात व्हिटॅमिन के आणि कॅल्शियम देखील भरपूर प्रमाणात असते जे हाडे मजबूत करण्यासाठी आवश्यक असतात.

हिरवे वाटाणे : एक कप उकडलेल्या हिरव्या वाटाण्यामध्ये सुमारे 8.58 ग्रॅम प्रथिने असतात, जे एका अंड्यापेक्षा जास्त असतात. यासोबतच हिरवे वटाणे हे व्हिटॅमिन सी, लोह आणि फायबरचा देखील चांगला स्रोत आहे. ते केवळ रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करत नाही तर हाडे मजबूत करण्यास देखील मदत करतात.

पालक : पालक हा बऱ्याचदा लोहाचा चांगला स्रोत मानला जातो, परंतु त्यात प्रथिने देखील चांगली असतात. एक कप शिजवलेल्या पालकामध्ये सुमारे 6 ग्रॅम प्रथिने असतात. त्यात असलेले जीवनसत्त्वे A, C आणि K हाडे आणि त्वचा दोन्हीसाठी फायदेशीर असतात.

ब्रुसेल्स कोबी : ब्रुसेल्स स्प्राउट्स लहान कोबीसारखे दिसत असले तरी पोषक तत्वांनी परिपूर्ण आहेत. त्यामध्ये प्रति 100 ग्रॅम सुमारे 3.4 ग्रॅम प्रथिने असतात. ते हाडांची ताकद वाढवण्यास, जळजळ कमी करण्यास आणि शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत करतात.

ग्रीन बीन्स : ग्रीन बीन्स केवळ चविष्टच नाहीत तर पौष्टिकतेनेही परिपूर्ण असतात. हेल्थलाइनच्या मते, एक कप ग्रीन बीन्समध्ये सुमारे 2.7 ग्रॅम फायबर असते. याशिवाय एक कप ग्रीन बीन्समध्ये सुमारे 2 ग्रॅम प्रथिने असतात. हे ग्रीन बीन्स कॅल्शियम, पोटॅशियम आणि फायबरचा देखील चांगला स्रोत आहेत, जे हाडे आणि पचन दोन्हीसाठी फायदेशीर आहेत.

# आजचे राशिभविष्य



**मेष**
बऱ्याच काळापासून मनात असलेली एखादी इच्छा आज पूर्ण होऊ शकते, ज्यामुळे तुम्ही खूप आनंदी असाल. आजचा दिवस फायदेशीर ठरेल.

**वृषभ**
तुम्ही व्यवसायाच्या कामासाठी प्रवासाला जाऊ शकता. वैवाहिक आयुष्यात प्रेम वाढेल. तुमचा जोडीदार प्रॉपर्टी खरेदी करण्यास सांगू शकतो.

**मिथुन**
तुम्हाला तुमच्या जोडीदारासोबत शॉपिंगला जायला लागू शकते. ज्यामुळे तुमच्या खिशावर परिणाम होईल. आरोग्याची काळजी घ्या.

**कर्क**
आर्थिक बाबतीत आजचा दिवस थोडा कमजोर असू शकतो. कोणत्याही गोष्टीबद्दल अति-आत्मविश्वास ठेवू नका. विवाहित लोकांच्या तणाव वाढू शकतो.

**सिंह**
तुमची कमाई चांगली राहील. व्यवसायातही चांगला लाभ मिळण्याची शक्यता आहे. प्रेम जीवनात असलेल्या लोकांसाठी दिवस खूप चांगला असेल.

**कन्या**
प्रियजनांसोबत वेळ घालवण्याची चांगली संधी मिळेल. तुम्ही डिनर डेटवर जाण्याचा प्लॅनही करु शकता. मोठी आनंदाची बातमी मिळू शकते.

**तूळ**
कुटुंबातील लोकांसाठीही दिवस आनंदाने भरलेला असेल. आज तुम्हाला आईबद्दल विशेष प्रेम वाटेल. कुटुंबात जमीन-जुमल्याशी चर्चा होऊ शकते.

**वृश्चिक**
करिअरसाठी हा एक चांगला दिवस आहे. खाजगी जीवनही समाधानकारक राहील.मानसिकदृष्ट्या स्वतःला निरोगी ठेवण्याचा प्रयत्न करा.

**धनु**
तणावामुळे तुमची आर्थिक स्थिती आणि तुमचा व्यवसायही प्रभावित होऊ शकतो. आज कामाच्या बाबतीत स्वतःवर पूर्ण विश्वास ठेवा.

**मकर**
माहेरच्या घरी जाण्याची संधीही मिळू शकते. तुम्हाला प्रमोशन मिळू शकते. व्यवसायात चांगल्या लाभाची शक्यता आहे. जीवन आनंदाने भरलेले असेल.

**कुंभ**
आज तुमचा बॉस तुम्हाला कामाबद्दल काही सल्ला देऊ शकतो. जो तुमच्यासाठी खूप फायदेशीर ठरेल. .मानसिकदृष्ट्या तुम्ही खूप मजबूत राहाल.

**मीन**
नोकरीसाठी आजचा दिवस खूप चांगला असेल. तुम्हाला तुमच्या वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. दांपत्य जीवनात काही अडचणी येऊ शकतात.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली,कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
बारावीनंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
-बीएएमएमसी-
(बॅचलर ऑफ मल्टीमीडिया अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून बारावी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅक्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in
MASS MEDIA

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
Admission Open 2025-2026
आपलं कॉलेज हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
7775851123, 8108559566
9619188558






# कायदा हातात घेणाऱ्यांवर कठोर कारवाई !

## - आमदार सुलभाताई गायकवाड





दैनिक ठाणे जीवनदीप

**कल्याण :** उल्हासनगर शहराजवळील आशाळेगाव येथे मंगळवारी सायंकाळच्या सुमारास चार ते पाच जणांच्या टोळक्याने हातात धारदार शस्त्र घेऊन रस्त्यावर दहशत माजवली.

आशेळे गावातील भक्तीपीठ, राम कॉलनी, नीलकंठ नगर, गणपती मंदिर व सँड फोस हायस्कुल परिसरात चार गावगुंडांनी बांबू, दांडके, कोयता यांसारख्या हत्यारांनी महिलांवर व लहान मुलांवर हल्ला करत, ४० ते ५० वाहनांची तोडफोड करून समाजात दहशत माजवण्याचा निर्लज्ज प्रयत्न केला. या घटनेची माहिती मिळताच आमदार सुलभाताई गायकवाड यांनी तात्काळ घटनास्थळी पोहोचून परिस्थितीचा आढावा घेतला.

संबंधित गुन्हेगारावर कडक कारवाईचे निर्देश देऊन आरोपींचा तात्काळ शोध घेऊन त्यांच्यावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करावेत असे निर्देश पोलीस उपायुक्त सचिन गोरे व विठ्ठलवाडी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अनिल पडवळकर यांना दिले.

> कायद्याच्या चौकटीत कडक शासन करून अशा समाज कंटकांना जायबंदी करण्याची कार्यवाही करावी. तसेच पोलीस बंदोबस्त वाढवून नागरिकांच्या सुरक्षेची खात्री द्यावी. यासाठी पोलीस प्रशासनाला सूचना दिली असून कोणत्याही गावगुंड प्रवृत्तीच्या लोकांना पाठीशी घातले जाणार नाही. गुन्हेगारीला मुळापासून उखडून टाकू. नागरिकांनी घाबरू नये. मी स्वतः या प्रकरणावर लक्ष ठेवून आहे.
> - आमदार सुलभाताई गायकवाड

# वसई विरार महापालिकेत नव्याने प्रभाग रचना

## तीन वर्षांपूर्वी प्रभाग रचनेवर केलेला खर्च वायफळ ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

विरार - राज्यात महानगरपालिकेच्या निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत. यातच गेल्या पाच वर्षापासून लोकप्रतिनिधी विना असलेल्या वसई विरार महानगरपालिकेचीही निवडणूक अखेर होणार आहे. या निवडणुकीसाठी नव्याने प्रभाग रचना करण्यात येणार आहे.

वसई विरार महानगरपालिकेच्या इतिहासात प्रथमच लोकप्रतिनिधीविना ५ वर्षे प्रशासकाने पालिका चालवली आहे. २०२२ ला या महापालिकेची प्रभाग रचना करण्यात आली होती. त्यात १२६ सदस्य असणार होते. आणि 3 सदस्यांचा एक प्रभाग असे ४२ प्रभाग तयार करण्यात आले होते.

परंतु सुरुवातीला कोरोनामुळे आणि नंतर ओबीसीमुळे निवडणूक पुढे ढकलण्यात आली होती. आता नवीन प्रभाग रचना करण्यात येणार असल्याने पूर्वी केलेल्या प्रभाग रचनेवरील खर्च मात्र वाया गेल्याचे बोलले जात आहे. नव्याने २९ प्रभाग होणार असून ४ चे २८ आणि ३ सदस्यांचा एक असे २९ प्रभाग असणार आहेत.

यावेळी सदस्य संख्या हि २०१५ मध्ये असलेली ११५ इतकीच राहणार आहे. परंतु प्रभाग संख्या मात्र २९ असणार आहे. यात ४ सदस्यांचे २८ प्रभाग असणार आहेत, तर एक प्रभाग हा ३ सदस्याचा असणार आहे.

वसई विरारमध्ये भाजपने ३ हि जागा जिंकल्याने येणाऱ्या निवडणुकीत महापालिकेच्या स्थापनेपासून सत्तेवर असलेल्या बहुजन विकास आघाडीला मात्र निवडणुकीत मेहनत करावी लागणार आहे. २०१५ ला महापालिकेत बहुजन विकास आघाडीने ११५ पैकी १०८ जागा जिंकून निर्विवाद वर्चस्व मिळविले होते. परंतु यावेळी मात्र त्यांना महायुतीचा सामना करावा लागणार आहे.

महायुतीत भाजप हा मोठा भाऊ असल्याने एकनाथ शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीला भाजप किती जागा सोडते, यावर निवडणुकीची गणिते ठरणार आहेत. तर दुसऱ्या बाजूला बहुजन विकास आघाडी एकला चलोचा मार्ग अवलंबिणार कि महाविकास आघाडी बरोबर हातमिळवणी करणार यावर सत्तेची गणिते ठरणार आहेत.

२०२१ ला जनगणना होणे अपेक्षित होते. परंतु ती झाली नसल्याने २०११ च्या जनगणनेनुसार येणारी निवडणूक होणार आहे. त्यामुळे वाढलेल्या लोकसंख्येमुळे प्रभाग मोठे होण्याची श्यक्यता वर्तविण्यात येत आहे.

आता नव्याने प्रभाग रचना होणार असल्याने आरक्षणे हि बदलली जाणार आहेत. त्यामुळे २०२२ ला महापौर पदाचे आरक्षण आरक्षित महिलेसाठी होते. तेही बदलले जाणार असे बोलले जात आहे.

# कापडी पिशव्यांसाठी वेंडिंग मशीन

## प्लॅस्टिक पिशव्यांना प्रतिबंध करण्यासाठी पनवेल महापालिकेचे नवे पाऊल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
पनवेल : ता. १२ :

प्लॅस्टिक पिशव्यांच्या वापरास प्रतिबंध बसावा, तसेच कापडी पिशवीचा पर्याय उपलब्ध व्हावा यासाठी पनवेल महापालिका प्रशासनाने नवे पाऊल उचलले आहे. खारघर सेक्टर १४ येथील भाजी बाजारात प्रायोगिक तत्त्वावर कापडी पिशव्यांसाठी वेंडिंग मशीन बसवण्यात आली आहे. याचे उद्घाटन माजी स्थायी समिती सभापती प्रवीण पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

भाजीपाला बाजारामध्ये होणारा प्लॅस्टिकचा वापर थांबविण्यासाठी पनवेल महापालिकेकडून आता कापडी पिशवीसाठी वेंडिंग मशीनचा पर्याय उपलब्ध करून दिला जाणार आहे. खारघर सेक्टर १४मधील भाजी बाजारामध्ये प्रायोगिक तत्त्वावर या वेंडिंग मशीनचे उद्घाटन करण्यात आले. पनवेल हे प्लॅस्टिकमुक्त करण्यासाठी महापालिकेने विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत. प्लॅस्टिकचा वापर करणाऱ्यांवर नियमितपणे कारवाई केली जात आहे तसेच कापडी पिशवी वापरण्यासाठी जनजागृतीही केली जात आहे. भाजीपाला, फळ बाजारात प्लॅस्टिक पिशव्यांचा मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. त्यामुळे नागरिकांना बाजारात सहजपणे कापडी पिशवी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

> जागतिक पर्यावरणदिनाचे औचित्य साधून खारघर सेक्टर १४मधील भाजीपाला बाजारामध्ये प्रायोगिक तत्त्वावर वेंडिंग मशीनचे उद्घाटन करण्यात आले आहे. खारघर परिसरातील भाजी बाजारामध्ये पुढील तीन ते चार दिवसांत वेंडिंग मशीन बसविले जाणार असून, त्यासाठी एजन्सीची नेमणूक करण्यात आली आहे. नागरिकांनी जास्तीत जास्त कापडी पिशव्यांचा वापर करावा.
> - जितेंद्र मढवी, प्रभाग अधिकारी, खारघर

**१० रुपयाला पिशवी**

खारघरमधील सेक्टर ७, १२, १३, २०, २१ व ३० ते ३५ परिसरातील भाजीपाला बाजारामध्ये वेंडिंग मशीन बसविण्यात येणार आहेत. १० रुपयांचे नाणे टाकल्यानंतर कापडी पिशवी मिळविता येणार आहे. वेंडिंग मशीनमुळे बाजारामधील प्लॅस्टिकचा वापर थांबविणे शक्य होणार आहे.

# ठाण्यात राजकीय पक्षांची बॅनरबाजी !

## महापालिकेच्या शहर सौंदर्यीकरणाला खीळ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे, ता. १२ शहरातील मध्यवर्ती कार्यालयाच्या वर्धापनदिनासाठी राज ठाकरे येणार असल्याने तीनहात नाक्यापासून हरिनिवास सर्कलपर्यंत स्वागतांचे फलक लावण्यात आले आहेत. यासाठी शहरातील दुभाजकांचा वापर करण्यात आल्याने पर्यावरणप्रेमींमधून नाराजी व्यक्त होत आहे.

ठाणे महापालिका प्रशासनाकडून फलकबाजीला चाप बसावा यासाठी विविध उपाययोजना आखत आहे, शिवाय बेकायदा जाहिरात फलकांवर कारवाईदेखील करण्यात येत आहे, पण राजकीय पक्षांकडून पालिकेच्या प्रयत्नांना खीळ घातली जात आहे.

बी. केबीन परिसरातील वडाच्या झाडाला शिवसेना शिंदे गटाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी लावलेला जाहिरात फलक त्याचाच एक नमुना होता. या गोष्टीला काही तासांचा अवधी उलटत नाही, तर ठाणे मध्यवर्ती कार्यालयाच्या वर्धापनदिनासाठी गुरुवारी येणाऱ्या राज ठाकरे यांच्या स्वागताचे फलक तीनहात नाक्यापासून ते थेट हरिनिवास सर्कल येथील दुभाजकांवर करण्यात आली आहे. यामुळे शहराचे विद्रुपीकरण होत असल्याने पर्यावरणप्रेमींकडून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

# किन्हवलीतील कामगारावर उपासमारीची वेळ

> **उपोषणाचा इशारा**
> या प्रकारानंतर दूंदाराम शेलवले यांनी तहसीलदारांनी मध्यस्थी करून कंपनीत पुन्हा कामाला घेण्यासाठी प्रयत्न करावे, अशा आशयाचे पत्र पाठवले आहे. अन्यथा कुटुंबासह कंपनीच्या गेटवर उपोषणाला बसणार असल्याचा इशारा दिला आहे.

> या प्रकरणात पीडित कामगाराने कंपनी व्यवस्थापनाविरोधात तक्रार केली आहे, मात्र कामगार आयुक्तांच्या कक्षेत हा विषय येतो. पीडित कामगाराने त्यांच्याकडे अर्ज करून न्याय मागावा. - अभिजित देशमुख, तहसीलदार, मुरबाड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

किन्हवली, ता. ११ (बातमीदार) २० वर्षापासून काम करणाऱ्या कंपनीतून तडकाफडकी काढून टाकल्याने एका कामगारावर उपासमारीची वेळ आली आहे. या प्रकरणात मुरबाडच्या तहसीलदारांकडे कंपनी व्यवस्थापनाविरोधात तक्रार करण्यात आली आहे.

मुरबाड तालुक्यातील संगमेश्वर तीर्थक्षेत्रा नजीक असलेल्या भादाणे गावच्या हद्दीत एकझॉटीक मशरूम कंपनी आहे. या कंपनीतील स्थानिक रहिवासी दूंदाराम शेलवले अनेक वर्षांपासून नोकरी करत आहेत. २५ ते २७ मे दरम्यान प्रकृती अस्वस्थामुळे कामावर गेले नव्हते. कामावर येणार नसल्याचा निरोप त्यांनी कंपनीमधील एका कामगाराकडे दिला होता. प्रकृती स्थिर झाल्याने २८ तारखेला कामावर गेले असता कंपनी व्यवस्थापक अशोक शेलवले यांनी दूंदाराम यांना कामावरून काढून टाकल्याचे सांगितले. दूंदाराम याने आजारपणात औषधोपचार केल्याची कागदपत्रे दाखवली. तरीसुद्धा कंपनी व्यवस्थापनाने कोणताही विचार केला नसल्याने रोजगार गेल्याने उपासमारीची वेळ आली आहे.

दरम्यान, या प्रकरणात कंपनीचे व्यवस्थापक अशोक शेलवले यांनी कोणतेही भाष्य करण्यास नकार दिला आहे, तर कंपनीचे मालक विनायक कामत यांनीही कोणताच प्रतिसाद दिलेला नाही.

# कोपर उड्डाणपुलावर खड्ड्यांचे साम्राज्य

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली, ता. १२ :** पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पालिका प्रशासन सज्ज झाले आहे; मात्र शहरातील रस्ते पहिल्याच पावसात खड्डेमय झाले आहेत. त्यामुळे रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांकडेदेखील लक्ष द्या, अशी मागणी नागरिक करू लागले आहेत.

कोपर उड्डाणपूल, ठाकुर्ली रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने सध्या वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. पावसाळ्यात या खड्ड्यांतून वाट काढताना चालकांची चांगलीच दमछाक होणार आहे.

ठाकुर्ली येथील रस्ता, ९० फिट रोड, रेल्वे समांतर रस्ता या मार्गावर खड्डे पडले आहेत. त्यासोबतच डोंबिवलीतील कोपर उड्डाणपुलावर पूर्व व पश्चिम दोन्ही दिशेला उतारावर मोठे खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमुळे वाहनांचा वेग कमी होत असून, सकाळी व संध्याकाळच्या वेळेत वाहतूक कोंडी होत आहे. कोपर उड्डाणपूल हा डोंबिवली पूर्व व पश्चिमेला जोडणारा महत्त्वाचा पूल आहे.

बहुतांश अवजड वाहने याच पुलावरून मार्गक्रमण करतात. या पुलाची नव्याने उभारणी केली आहे. तसेच पुलावर खड्डे पडू नयेत, म्हणून पालिका प्रशासनाने मास्टिक अस्फाल्टचा वापर केला आहे; मात्र काम होताच पहिल्याच पावसात या पुलावर खड्डे पडले आहेत. पश्चिम दिशेकडील रस्त्याची दुरवस्था झाली आहे. त्यावर सिमेंट मिश्रित खडी टाकण्यात आली आहे. ही खडी रस्त्यावर पसरली आहे. उतारावरील वळणावर ही खडी पसरल्याने दुचाकीस्वार चढण घेताना घसरत आहेत.

दोन दिवसांपासून पावसाने उघडीप दिल्याने रस्त्यावर पडलेले खड्डे भरावेत, अशी मागणी नागरिक करत आहेत. शहरातील रस्त्यांचे सिमेंट काँक्रीटीकरण केले आहे; मात्र काही रस्ते हे अद्याप डांबरी आहेत. या रस्त्यावर अवकाळी पावसाने खड्डे पडले आहेत. त्यातून जाताना वाहने आदळून अपघात होत आहेत. जे महत्त्वाचे रस्ते डांबराचे आहेत, त्यांची पाहणी करून त्यावरील खड्डे भरले पाहिजेत. केवळ खडी न टाकता त्याची डागडुजी करावी, अशी मागणी नागरिक करत आहेत.

# पावसाळ्यातील आपत्ती व्यवस्थापनासाठी केडीएमसी सज्ज

## पालिका मुख्यालयात आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण, ता. १२ :** पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर एखादी आपत्ती, दुर्घटना घडल्यास नागरिकांच्या मदतीसाठी केडीएमसीने महापालिका मुख्यालयात मुख्य आपत्ती व्यवस्थापन कक्ष स्थापन केला आहे. त्याशिवाय लवकरात लवकर मदत पोहोचावी, यासाठी प्रभागनिहाय आपत्कालीन कक्षदेखील सुरू केले आहेत. हे आपत्कालीन कक्ष २४ तास सुरू राहणार आहेत. त्यासाठी अधिकारी व कर्मचारी नियुक्त केले आहेत. एखादी दुर्घटना किंवा आपत्ती घडल्यास नागरिकांनी महापालिकेच्या हेल्पलाइन नंबरवर संपर्क साधावा, असा आवाहन आयुक्तांनी केले आहे.




कल्याण डोंबिवली महापालिकेने पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना मदत करण्यासाठी आपत्कालीन कक्ष स्थापन केले आहेत. कल्याण डोंबिवली महापालिकेच्या मुख्यालयात मुख्य आपत्ती व्यवस्थापन कक्ष स्थापन केला आहे. त्याप्रमाणे महापालिकेच्या १० प्रभागांत प्रभागनिहाय आपत्कालीन कक्ष स्थापन केले आहेत. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पूर, इमारत कोसळणे अशी एखादी दुर्घटना घडल्यास नागरिकांना तत्काळ मदत मिळावी, यासाठी आपत्कालीन कक्ष स्थापन केले आहेत तसेच पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रात एनडीआरएफचे पथकदेखील दाखल झाल्याची माहिती आयुक्त अभिनव गोयल यांनी दिली.

# खासदार बाळ्या मामांच्या उपस्थितीत भिवंडीतील वाहतूक कोंडीवर महत्वपूर्ण बैठक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी लोकसभा क्षेत्रातील विशेषतः भिवंडी शहर व ग्रामीण भागात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या मोठ्या वाहतूक कोंडीच्या प्रश्नावर आज भिवंडी मानकोली येथे महत्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीत सध्याच्या स्थितीत निर्माण झालेल्या वाहतूक कोंडीचा आढावा घेण्यात आला, तसेच उपाययोजना आणि सुधारणा यंत्रणा कार्यक्षम करण्याबाबत दिशा ठरवण्यात आल्या. यावेळी खासदार सुरेश (बाळ्या मामा) म्हात्रे यांनी वाहतूक सुरळीत होण्यासाठी लवकरच अंमलात आणल्या जातील अशा विशेष सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या या बैठकीस भिवंडी, मानकोली, रांजणोली वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,एम.एस.आर.टी.सी., सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) यांचे अधिकारी तसेच इतर संबंधित मान्यवर उपस्थित होते.



> भिवंडीकरांना वाहतूक कोंडीमुक्त वातावरण मिळावे यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. शासन, प्रशासन व स्थानिक यंत्रणांशी समन्वय साधून लवकरच सकारात्मक बदल घडेल अशी आशा आहे. - खासदार सुरेश (बाळ्या मामा) म्हात्रे

# लाचखोर पोलीस निरीक्षकावर कारवाई

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल :** बांधकाम व्यावसायिकाकडून मागील वर्षी सप्टेंबर महिन्यात चार लाखांची लाच स्वीकारणाऱ्या नवी मुंबईच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकाची संपत्ती उत्पन्नापेक्षा तब्बल २९७ टक्क्यांहून अधिक असल्याचे समोर आले आहे.

मागील वर्षी सप्टेंबर महिन्यात एका बांधकाम व्यावसायिकाकडून एन. आर. आय. पोलीस ठाण्याच्या तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश कदम याला चार लाख रुपयांची लाच स्वीकारताना अटक करण्यात आली होती. सतीश कदम याच्या मागील ११ वर्षांच्या काळातील आर्थिक चौकशीमध्ये उत्पन्नापेक्षा अधिक बेहिशेबी मालमत्ता सापडली. बाजारमूल्य ३ कोटी ४८ लाख ४० हजार रुपये आहे.




# शहापूर येथे शासकीय वसतिगृहात प्रवेश प्रक्रिया सुरु

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता • शहापूर: महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभाग व विशेष सहाय विभाग, मंत्रालय मुंबई अंतर्गत कार्यरत असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, शहापूर शासकीय वसतिगृहात इयता 8 वी पासून पुढील शिक्षण घेणाऱ्या व महाविद्यालयीन विभागातील प्रथम वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी या वसतिगृहात वर्ग 11वी, 12वी, आ.टी.आय/अभियांत्रिकी पदविका प्रथम वर्ष (10वी उर्तीर्ण) विद्यार्थ्यांकरिता सन 2025-26 या शैक्षणिक वर्षाकरिता वसतिगृहात रिक्त असणाऱ्या जागेवर मोफत प्रवेश देणे सुरु आहे. वसतिगृह प्रवेश अर्ज ऑनलाईन पध्दतीने https://hms.mahait.org या पोर्टलद्वारे विद्यार्थ्यांना भरता येतील. हे पोर्टल दि.11 जून 2025 पासून सुरु होणार आहे. अर्जासोबत लागणारी प्रमाणपत्रे (अपलोड करावयाची कागदपत्रे):- गुणपत्रिका, टि.सी., जातीचा दाखला (सक्षम प्राधिकारी), उत्पन्नाचा दाखला (रु.2 लाख 50 हजाराच्या आत प्राधिकारी), रहिवासी दाखला (सरपंच/तलाठी/नगरसेवक), आधार कार्ड, शाळा/ महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र अथवा प्रवेश पावती, आधार संलग्न बँक खाते पासबुकच्या पहिल्या पानाची झेरॉक्स, पासपोर्ट साईज फोटो. या ऑनलाईन पध्दतीने भरण्यात आलेल्या प्रवेश अर्जाची छांयाकीत प्रत गृहपाल, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, शहापूर, गोठेघर, दिक्षा अपार्टमेंट येथे जमा करण्यात यावी. अधिक माहितीकरिता गृहपाल प्र.ना मडावी यांच्याशी संर्पक साधावा मो. क्रमांक ९७६७६१२८९७/८७९३५८७७२१.

उल्हासनगर मनपा

# मालमत्ता कर विभागाचे कामकाज ठप्प



## भाजपा व्यापारी अध्यक्षानी वेधले लक्ष

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : आमदार कुमार आयलानी यांच्या सोबत शिष्टमंडळाने शहरातील विविध समस्यांच्या गाऱ्हाणी मांडताना भाजपचे व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष दीपक छतलानी यांनी मालमत्ता कर विभागाच्या कर निर्धारक व संकलक निलम कदम यांची बदली झाल्यापासून या विभागाचे कामकाज गेल्या 15 दिवसांपासून ठप्प पडल्याबाबत अतिरिक्त आयुक्त किशोर गवस यांचे लक्ष वेधले आहे.

रस्त्यांचे खोदकाम सर्वत्र करण्यात आले असून त्यास गती देण्यात यावी,सीसीटीव्ही कॅमेरे करिता जे रस्ते खोदण्यात आले आहेत ते काम पूर्ण झाल्यावरही तात्काळ भरले जात नाही.त्यामुळे खोदकाम करण्यात आल्यानंतर बाहेर ठेवण्यात आलेली माती ही रस्त्यावर येत आहे.पावसात या मातीचे चिखलात रूपांतर होत असून त्यामुळे नागरिकांना चालणे मुश्कील होत आहे.आदी समस्या यावेळी मांडण्यात आल्या.

याप्रसंगी भाजपा व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष दीपक छतलानी यांनी कर निर्धारक व संकलक निलम कदम यांची बदली झाल्याने त्यांच्या जागी मयुरी कदम यांची नियुक्ती करण्यात आली आहे.मात्र गेल्या 15 दिवसांपासून मालमत्ता कर विभागात नागरिकांची कोणतीही कामे पूर्ण होत नसून त्यामुळे त्यांना माघारी जावे लागत असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त किशोर गवस यांना दिली.यावेळी आमदार कुमार आयलानी,माजी नगरसेवक लाल पंजाबी,महेश सुखरामानी, डॉ.प्रकाश नाथानी,किशोर वनवारी,राजू जग्याशी,आणि पदाधिकारी उपस्थित होते.

# क्लस्टर योजना युद्धपातळीवर राबवा

## आमदार राजेश मोरेंची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकारातून ठाणे महापालिका हद्दीत क्लस्टर योजनेची कामे सुरू झाली आहेत. त्याच धर्तीवर कल्याण डोंबिवली महापालिका हद्दीतही क्लस्टर योजनेची कामे तातडीने सुरू करावीत त्याचबरोबर आरक्षित असलेल्या भूखडांचा देखील क्लस्टर योजनेत समावेश करावा या मागणीसाठी आज कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांनी पालिका आयुक्त अभिनव गोयल यांची भेट घेत त्यांना निवेदन दिले. या प्रसंगी



शिवसेना उपजिल्हाप्रमुख राजेश कदम, शिवसेना शहर प्रमुख रवी पाटील, निलेश शिंदे, उपशहर प्रमुख मोहन उगले, माजी नगरसेवक मल्लेश शेट्टी, गणेश जाधव, प्रशांत काळे, सुनील वायले, विद्याधर भोईर, माजी नगरसेविका विजया पोटे, छाया वाघमारे, विवेक खामकर यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी आमदार मोरे यांनी क्लस्टर योजनेच्या माध्यमातून धोकादायक इमारती चाळी तसेच झोपडपट्टीतील नागरिकांना हक्काचा सुरक्षित निवारा देणे शक्य होऊ शकेल. यामुळे या योजनेचे काम तातडीने सुरू करण्याची मागणी केली. दरम्यान आयुक्त गोयल यांनी आमदारांच्या मागणीचा सकारात्मक विचार करण्यात आला असून क्लस्टर योजनाची तातडीने अंमलबजावणी करण्याचे आश्वासन दिले. तर यावेळी पालिकेच्या दहा प्रभागात प्रत्येकी एक क्लस्टरचा पायलट प्रोजेक्ट सुरू करण्याची सूचना देखील उपस्थित पदाधिकाऱ्यांनी केली.




# पेण नगरपालिकेच्या शौचालयांची दुरावस्था ■ नागरिक त्रस्त

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण शहरातील एक ना अनेक समस्या आता चव्हाट्यावर येत असून स्वच्छतेच्या बाबतीत लाखो रुपये खर्च करणाऱ्या पेण पालिकेच्या बीओटी तत्वावरील शौचालयांची दुरावस्था समोर आली आहे. पेण कुंभार आळी येथील या शौचालयाच्या संरक्षक खिडक्याच गेली अनेक महिन्यांपासून गायब असल्याचा धक्कादायक प्रकार जनतेसमोर आला आहे.

अरुंद रस्ते, अशीध्त पाणी, अस्वच्छता, दुरावस्थेत असणारी गटारे, खोदून ठेवलेले रस्ते, डासांचा प्रादुर्भाव या सर्वच समस्यांच्या गर्तेत अडकलेल्या पेण पालिकेचा आता आणखी एक धक्कादायक कारभार जनतेसमोर आला आहे. पेण कुंभार आळी येथे पालिकेच्या हद्दीत बीओटी तत्वावर बांधण्यात आलेल्या शौचालयाची दुरवस्था झाली आहे. या शौचालयाला भिंतीमध्ये लावण्यात आलेल्या सर्व खिडक्याच गेली अनेक महिने झाले गायब असल्याने या खिडक्या पुन्हा कधी



लावण्यात येतील या प्रतिक्षेत येथील स्थानिक नागरिक आहेत. त्याशिवाय या शौचालयात विद्युत रोषणाईची कमतरता, दुर्गंधीयुक्त वास, निचरा होणारी फुटलेली गटारे याचा त्रास देखील नागरिकांना सहन करावा लागत आहे. शौचालयात लाईट नसल्याने रात्रीच्या लहान मुले, महिला वर्ग आणि जेष्ठ नागरिक जाणे टाळतात त्यामुळे या शौचालयाच्या समस्यांकडे पेण पालिका केव्हा लक्ष देणार असा सवाल स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे.

> **कुंभार आळी येथील सार्वजनिक शौचालयाच्या बाबत पालिका प्रशासनाच्या अनेक वेळा कानावर घातले आहे. मात्र त्यांनी नेहमीच या समस्येकडे दुर्लक्ष केले आहे. पालिकेकडून गेली दोन महिने सदर खिडक्या बनवायला दिल्या असल्याचे सांगण्यात येत आहे, मात्र कासवगतीने सुरू असलेल्या या कामाबाबत स्थानिकांमध्ये नाराजी आहे.**
> **– हितेश पाटील, स्थानिक नागरिक**

मुरबाड मध्ये

# कंद लागवडीची लगबग सुरू!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



मुरबाड : मुरबाड तालुक्यातील ग्रामीण तसेच आदिवासी पट्ट्यात व मुरबाड शहर परिसरात करवांधे/कोंदीसह रान कंदाची लागवडीची मोठ्या प्रमाणात लगबग सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे. कारण पाऊस सुरू झाला की जून महिन्यातच तालुक्यातील प्रत्येक गावातील आपापल्या आवारात करवांधे व कोंदीची लागवड केली जाते, तसेच लागवड करण्यासाठी आवारात एक मातीचा ओटा ओढला जातो त्यामध्ये पावसाचा अंदाज बघून करवांधे व कोंदीची लागवड केली जाते. महिनाभरात करवांधे व कोंदीचा ताना उंच होतो त्यानंतर हाताने खाली पडू नये म्हणून त्याला एक लाकडाचा (खाकरीचा) आधार दिला जातो. त्यानंतर दिवाळीच्या दरम्यान या करवंद्याच्या किंवा कोंदीच्या तान्याला करवंदे/ कोंदीं येतात. त्यामुळे आलेल्या करवांधे व कोंदी या दिवाळीच्या सणांमध्ये फराळ म्हणून उपयोग केला जातो.तसेच करवंदे व कोंदी खाण्यासाठी रूचकर लागतात तसेच शरीरात चांगले विटामिन्स मिळतात अशी माहिती वयोवृद्ध नागरिक देत आहेत.

दिवाळीच्या दरम्यान करवांधे व कोंदी खुडल्या जातात, तसेच काही करवांधे व कोंदी त्याचबरोबर आरकुंदी यांना एका रांजणात वर्षभर ठेवतात तसेच पावसाळ्यात ठेवलेला रांजण बाहेर काढला जातो व करवांधे व कोंदी यांना मोहर आलेलं असतात. त्यांची आवरात ओटा ओढून रानकंदची लागवड केली जाते.

# सुनील इंगळेना ‘आदर्श समाजसेवक पुरस्कार’

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : पुरस्कार प्रेरणा देतात आणि त्यातून राष्ट्र निर्मिती होते या दृष्टिकोनातूनच विविध मान्यवर व तळागाळात कार्य करणाऱ्या संस्था असतात त्या निरपेक्ष वृत्तीने आपले समाजाभिमुख व लोकाभिमुख कार्य करून समाजातील तन-मन-धनाने कार्य करणाऱ्या समाजसेवकांचे कौतुक करत त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी त्यांची उमेद वाढवण्यासाठी कार्यरत असतात. मुंबई येथील जॉय ऑफ गिव्हिंग ही नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर असलेली संस्था या संस्थेने सुनील इंगळे यांच्यातील समाजसेवेची आवड व विविध क्षेत्रांमधील त्यांचे बहुमोल



योगदान या त्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाची दखल घेऊन त्यांना आदर्श समाजसेवक पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. पुरस्कारामध्ये शाल श्रीफळ ट्रॉफी याचा समावेश होता. इंगळे यांना आज पावतो 64 राज्यस्तरीय व 2 राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांनी पत्नीसह नेत्रदानाचा संकल्प केला असून गेल्याच वर्षी जीवनदाता सामाजिक संस्थेच्या सहकार्याने केईएम हॉस्पिटल मुंबई येथे देहदान संकल्प नोंदणी केली आहे. विविध सामाजिक शैक्षणिक संस्थांमधून ते कार्यरत असतात त्यांच्या या बहुरंगी व्यक्तिमत्त्वामुळे ते नेहमीच सर्वांच्या कौतुकास पात्र ठरत असतात. यावेळी संस्थेचे अध्यक्ष गणेश हिरवे, कामगार नेते अविनाश दौंड, उच्च न्यायालयाचे वकील जगदीश जायले,समुपदेशक व मार्गदर्शक एडवोकेट रुषीला रिबेलो, जेष्ठ पत्रकार राजेंद्र घरत, कामगार नेते जनार्दन जंगले,पत्र लेखक वैभव पाटील उपस्थित होते उपस्थित सर्व मान्यवर प्रमुख पाहुण्यांनी जॉय सामाजिक संस्था करीत असलेल्या कार्याचे कौतुक करत प्रामाणिक व शुद्ध हेतूने समाजातील वंचित गरीब व गरजू घटकांना सभासदाच्या वर्गणी द्वारे आवश्यक सहकार्य करणाऱ्या जॉय सारख्या संस्थांची समाजाला गरज असल्याचे मत व्यक्त केले. सदर राज्यस्तरीय सोहळ्यास राज्यभरातून विविध मान्यवर समाजसेवक व पत्रकार उपस्थित होते.

# रवींद्रनाथ टागोरांचे पुरातन घर तोडले

## भाजपाचे आंदोलन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : प्रख्यात कवी, साहित्यिक आणि नोबेल पारितोषिक विजेते गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांचे घर तोडल्याच्या घटनेने देशभरात संतापाची लाट उसळली आहे. याच घटनेचा तीव्र निषेध करत डोंबिवली पूर्वेतील इंदिरा गांधी चौकात आज भाजपच्या वतीने निषेध आंदोलन करण्यात आले. आंदोलकांनी या कृत्याचा तीव्र शब्दांत निषेध करत, दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली.

आपल्या देशाचे राष्ट्रगीत ज्यांनी लिहिलं ते रवींद्रनाथ टागोर यांच्या घराची काही समाजकंटकांनी नासधूस केली तोडफोड केली त्याच्या निषेधार्थ आज भारतीय जनता पार्टी कल्याण जिल्ह्याच्या वतीने डोंबिवली इंदिरा गांधी चौक या ठिकाणी बांगलादेश सरकार व तेथील समाजकंटकाचा जाहीर निषेध करण्यात आला. भाजपचे कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली हे आंदोलन करण्यात आले. याप्रसंगी भाजपा अनुसूचित जाती मोर्चा प्रदेश सरचिटणीस शशिकांत कांबळे, जिल्ह्याचे अध्यक्ष नंदू परब, माजी जिल्हाध्यक्ष नाना सूर्यवंशी, नंदू जोशी, मितेश पेणकर, मंदार टावरे, स्वप्निल काटे, आतिश चौधरी, सुभाष मस्के यांच्यासह अनेक कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

# अंबरनाथमधील अनधिकृत बांधकामांवर कारवाई

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : शहरातील वाढत्या बांधकामां विरोधात अंबरनाथ नगर परिषदेचे मुख्याधिकारी उमाकांत गायकवाड यांनी आक्रमक पवित्र धारण केला आहे. शहराच्या रहदारीस अडथळा आणणाऱ्या तसेच विद्रुपीकरण करणाऱ्या अनेक बेकायदेशीर बांधकामांवर अतिक्रमण विभागाच्या विभागाने आज पाडक कारवाई करत हातोडा बरसावला. कल्याण - बदलापूर रस्त्यावरील लोटस तलाव



परिसरातील राखीव भूखंडा वरील अनधिकृत बांधकामावर हि कारवाई झाली. नगरपालिकेने पोलीस बंदोबस्तात, तसेच नगर रचनाकार,

## नरेंद्र संखे टिमची दमदार कारवाई...

विद्युतविभाग, आणि स्वतः मुख्याधिकारी उमाकांत गायकवाड यांच्या आणि वरिष्ठ पोलिस निरीक्षक बालाजी पांढरे यांच्या उपस्थितीत नगरपालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने विभाग प्रमुख नरेंद्र संख्ये यांनी मोठी तोडक कारवाई केली. अंबरनाथ नगर पालिकेच्या हद्दीतील, कल्याण-बदलापूर रस्त्यावरील लोटस तलाव परिसरातील ,बगीचा व गार्डन करीता आरक्षित असलेल्या आरक्षण क्रमांक ४५, भूखंडा वरील, तसेच जलतरण तलाव करीता आरक्षित असलेल्या आरक्षण क्रमांक ८८, वरील जागेवर अतिक्रमण करून केलेली अनधिकृत २१ वाणिज्य दुकानें, २०, व्यावसायिक टपऱ्या, आणि ५०, बांधकामावर तोडक कारवाई केली, या अगोदर येथील पश्चिम भागातील साईबाबा मंदिर ते विमको नाका परिसरातील १२ अनधिकृत हातगाड्या फेरीवाले, ५ टपऱ्या, तसेच विमको नाका ते फ़ॉरेस्ट नाका पर्यंत १० अनधिकृत हातगाड्या ९ टपऱ्या वर पोलीस कर्मचारीच्या बंदोबस्तात, नगरपालिकेतील कर्मचाऱ्यांनी तोडक कारवाई केली. मुख्याधिकारी उमाकांत गायकवाड यांच्या आदेशानुसार अतिक्रमण प्रमुख नरेंद्र संख्ये सुनील गावित, नगरपालिकेचे संबंधित खातेप्रमुख व तोडक विभागाच्या ५० कर्मचाऱ्यांनी मिळून ही तोडक कारवाई केली




जगदिश पाटील माजी सरपंच कांद्रेभूरे यांच्या पाठपुराव्यामुळे

# स्मशानभूमीस जागा उपलब्ध

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

सफाळे : मौजे ग्र कांद्रेभुरे ग्रामपंचायत हद्दीतील भुरेपाडा येथे नवीन स्मशानभूमी बांधण्यासाठी जनसुविधा योजनेअंतर्गत सन २०२३-२४ साली अंदाजे ५ लक्ष निधी उपलब्ध करून देण्यात आलेला परंतु नवीन स्मशानभूमी बांधण्यासाठी भुरेपाडा - कांद्रेभुरे येथे जमीन उपलब्ध नसल्याने आलेला निधी परत जातो की काय हि भिती गावकऱ्यांना वाटत होती. परंतु स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तो निधी ग्रामपंचायत ती कडे परत वर्गिकरण केला.

या अनुषंगाने जगदिश पाटील माजी सरपंच कांद्रेभुरे यांनी मनिषाताई निमकर - माजी राज्यमंत्री महाराष्ट्र राज्य तथा जि.प.पालघर माजी समाजकल्याण सभापती यांच्या सहयोगाने,व सहकार्याने, ग्रामपंचायत कांद्रेभुरे यांनी वनविभागाची जागा, नविन स्मशानभूमी भुरेपाडा



येथे जागा मिळण्यासाठी वनविभागाचे अधिकारी. वनक्षेत्रपाल सफाळे, सहाय्यक वनसंरक्षक अधिकारी पालघर,व उपवनसंरक्षक संरक्षक डहाणू यांच्या कडे स्मशानभूमी जागा उपलब्ध करण्यासाठी केलेल्या अर्जाचां सतत पाठपुरावा करीत. मा.श्री.गणेश नाईक पालघर जिल्हा पालकमंत्री यांना कांद्रेभुरे - भुरेपाडा, नविन स्मशानभूमी बांधण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यासाठी माहिती देत लेखी निवेदन सुद्धा जगदिश पाटील यांनी दिलेले.

यामुळे कांद्रेभुरे ग्रामविकास अधिकारी, साहेबराव राठोड जगदीश पाटील, मनिषाताई निमकर- माजी राज्यमंत्री, आजी ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच व सदस्य यांच्या सहयोगाने व सहकार्याने ग्रामपंचायत कांद्रेभुर. ता. जि. पालघर येथील भुरेपाडा नवीन स्मशानभूमी बांधण्यासाठी ( गट नंबर ६८, सर्वे नंबर १३५ ) मधील जागा २०×२० = ४०० चौरस मीटर जागा, (काही अटी व शर्ती लागू) दिनांक २१ मे २०२५ च्या आदेश जा.क्र. ब/ २०/ जमीन/ ६४०/ सन २०२५ - २६ च्या आदेशानुसार ग्रामपंचायत कांद्रेभुरे भुरेपाडा स्मशानभूमी बांधण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामुळे या कामासाठी सहकार्य करणारे सर्वांचे भुरेपाडा येथील रहिवासी यांनी आभार मानले आहेत.




‘ठाणे जीवनदीप वार्ता’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अ‍ॅड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024